जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १४ दिनांक - ०८/०१/२०२५**

लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर

**एम. जी रोड येथील कॅफेमध्ये चोरी करणा-या डिलीव्हरी बॉयला संभाजीनगर येथुन अटक**

यातील फिर्यादी यांचे अंबा कॉम्प्लेक्स, एम. जी रोड, कॅम्प, पुणे येथे कॉफी शॉप असुन, त्यांच्याकडे गेली दोन वर्षापासुन काम करणारा डिलीव्हर बॉय नामे **अंगद राजेंद्र कदम, वय २४ वर्ष, रा. पोलादपुर, जि. रायगड** याने दि. २६/१२/२०२४ रोजी सर्व कामगार हे झोपी गेलेले असताना, कॉफी शॉप उघडुन आत प्रवेश करून लॉकर च्या काऊंटर मध्ये ठेवलेले रोख ९५,०००/- रूपये चोरून निघुन गेला. याप्रमाणे फिर्यादी यांनी लष्कर पोलीस स्टेशन, येथे तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला.

दाखल गुन्ह्यातील आरोपी अंगद कदम हा रोख ९५०००/- रूपये चोरून महाबळेश्वर, महाड, नाशिक व संभाजीनगर इत्यादी ठिकाणी फिरून चोरलेल्या रकमेवर मजा मारत असताना, तपास पथक लष्कर पोलीस स्टेशन चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांनी केलेल्या तांत्रिक माहितीवरून आरोपी अंगद राजेंद्र कदम हा हर्सुल, जि. संभाजीनगर येथे असल्याची माहिती मिळाल्याने, मिळालेल्या माहितीच्या आधारे अथक प्रयत्न करून आरोपीचा संभाजीनगर येथे शोध घेवुन आरोपीस संभाजीनगर येथुन अटक असुन त्याच्याकडुन चोरी केलेली रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

मा. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मा. पोलीस उप आयुक्त, परि. ०२, पुणे शहर, मा. सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर, श्री. गिरीषकुमार दिघावकर, पोलीस निरिक्षक(गुन्हे) प्रदिपकुमार पवार यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरिक्षक राहुल घाडगे व पोलीस अंमलदार महेश कदम, सोमनाथ बनसोडे, संदिप उकिरडे, सचिन मांजरे, प्रविण गायकवाड, लोकेश कदम, सागर हराळ, अलका ब्राम्हणे यांनी केली.